आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत "पर्यटनासाठी वनांचा विकास करणे " या योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करणेबाबत..
(लेखाशिर्ष क्र. २४०६ ८६५१)

**महाराष्ट्र शासन.**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र. क्र.१६ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- २१/०३/२०१८

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८.
३) समक्रमांकीत शासन निर्णय दि. ०३/११/२०१७
४) महसूल व वन विभाग, नस्ती क्रमांक डब्ल्युएलपी -२०१७/ प्र. क्र.१८६ /फ-१.

**शासन निर्णय: -**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५, २४०६-वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१-वनीकरण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना -राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०९) पर्यटनासाठी वनांचा विकास करणे, (२४०६ ८६५१) या लेखाशीर्षाखालील रु.२००.००लाख इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. यापैकी रु. १४०.०० लक्ष निधी संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेले आहेत.

संदर्भाधीन येथे नमुद वित्त विभागाच्या दि.०६.२.२०१८ च्या परिपत्रकास अनुसरुन महसूल व वन विभागाने वाचा क्र. ४ येथे नमुद नस्तीद्वारा प्रस्तावित केल्यानुसार आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित निधीच्या ८०% च्या मर्यादेत (०१) (०९) पर्यटनासाठी वनांचा विकास करणे, (२४०६ ८६५१) या लेखाशिर्षाखालील ०२-मजुरी या बाबी करीता उर्वरीत रु.८.०० लाख व व २१-पुरवठा व सामुग्री या बाबीखाली उर्वरीत रु.१२.०० लाख असा एकुण रु.२०.०० लाख (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) इतका उर्वरीत निधी मुख्य वनसरंक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती अंतर्गत सिपना वन्यजीव विभाग, गुगामल वन्यजीव विभाग तसेच आकोट वन्यजीव विभाग येथील पर्यटन स्थळांच्या विकासाकरिता या योजनेचे नियंत्रक अधिकारी तथा सचिव (वने), महसूल व वन विभाग यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व महसूल व वन विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता (TSP) उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची महसूल व वन विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803201507438824 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.21 17:33:43 +05'30'

**( रविंद्र दि. औटे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. सचिव, (वने) महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
६. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. महसूल व वन विभाग (फ-२), मंत्रालय, मुंबई
१०. अवर सचिव, कार्या-१४, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.